12-06-2025-Dai-04-New_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/11/2025 10:17 PM Page 1



## निवडक




### वैभव सूर्यवंशीची तुफानी फटकेबाजी

**मुंबई, दि. ११ :** इंग्लंडला जाण्यापूर्वी वैभव सूर्यवंशी आता भन्नाट फॉर्मात आला आहे. कारण इंग्लंडला जाण्यापूर्वी आता वैभव सूर्यवंशीने धडाकेबाज फलंदाजी करत १९० धावांची धडाकेबाज खेळी साकारली आहे. वैभवने यावेळी कशी तुफानी खेळी साकारली आहे, त्याचा व्हिडिओ आता जोरदार व्हायरल झाला आहे.

हा १३ वर्षांचा मुलगा काय करणार, हे आयपीएलपूर्वी म्हटले गेले होते. पण या आयपीएलमध्ये वैभवने आपली छाप पाडली आणि ३५ चेंडूंतच धमाकेदार शतक झळकावले होते. आयपीएलच्या इतिहासात सर्वात जलद शतक झळकावणारा तो पहिलाच भारतीय क्रिकेटपटू ठरला होता.

रायस्थान रॉयल्सने त्याला १ कोटी आणि १० लाख रुपयांमध्ये संघात दाखल केले होते. आयपीएलच्या सात सामन्यांत त्याने २५२ धावा केल्या होत्या. आता पुन्हा एकदा वैभव सूर्यवंशीने आपली दाखल सर्वांना घ्यायला लावली आहे.

वैभवने इंग्लंडच्या दौऱ्यापूर्वी भारतमध्ये सराव सामना खेळला. या सामन्यात वैभवने चौकार आणि षटकारांचा वर्षाव करत १९० धावांची धमाकेदार खेळी साकारली. ही १९० धावांची खेळी साकारताना त्याने फक्त ९० चेंडू खेळले. यावरुन वैभवची ही खेळी किती आक्रमक होती, याचा अंदाज येऊ शकतो. वैभवला आता भारताच्या १९ वर्षांखालील संघात स्थान देण्या आले आहे. भारताचा संघ काही दिवसांतच इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार आहे. दौऱ्यात भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच वनडे सामन्यांची मालिका खेळवण्यात येणार आहे. त्यानंतर अजून दोन सामने इंग्लंडच्या दौऱ्यामध्ये होणार आहेत. पण या दौऱ्यावर जाण्यापूर्वी आता वैभवने संधीचे सोने केले आहे आणि आपली निवड कशी सार्थ आहे, हे दाखवून दिले आहे.

राहुल द्रविड यांच्या मार्गदर्शनाखाली वैभवची कारकिर्द चांगलीच फुलायला लागली आहे. त्यामुळे आता वैभवला भारताच्या १९ वर्षांखालील संघात निवडले गेले आहे. त्यामुळे आता वैभव हा आता इंग्लंडमध्ये कशी कामगिरी करतो, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल. कारण त्यानेळी भारताचा संघही इंग्लंडमध्येच आहे. त्यामुळे वैभवला भारतीय संघातील खेळाडूंकडून चांगले मार्गदर्शनही मिळू शकते.

### शांता विद्यालयात वाह्यांचे वाटप



**शिवोली : शांता विद्यालयात वह्या वाटपप्रसंगी उपस्थित शिवशंकर मयेकर व मान्यवर.**

*टीम दैनिक हेराल्ड*

**शिवोली, दि. ११ :** समाजसेवक शिवशंकर मयेकर यांच्या पुढाकाराने शिवोली येथील शांता विद्यालयात वाह्यांचे वाटप करण्यात आले. विद्यालयाच्या नर्सरी ते दहावीपर्यंत विद्यार्थ्यांना वह्या प्रदान करण्यात आल्या. यावेळी शिक्षक वर्ग व इतर मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घ्यावे यासाठी सर्व ती मदत करण्यास आपण तयार असल्याचे शिवशंकर मयेकर यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले. भविष्यातही विद्यार्थ्यांना अशाच प्रकारे मदत केली जाणार असल्याचे त्यांनी यावेळी आश्वासन दिले.

### हरमल गणेशोत्सव मंडळाची २२ रोजी बैठक

टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ११ :** येथील हरमल सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची बैठक रविवार दि. २२ रोजी संध्याकाळी ४ वाजता गणेशोत्सव सभागृहात होणार असल्याचे अध्यक्ष संतोष कोरकणकर यांनी सांगितले.

या बैठकीत मागील जमाखर्च अहवाल, उत्सव २०२५ साठी नवीन कार्यकारी व उप समित्यांची निवड व अन्य विषयावर चर्चा करण्यात येणार आहे. तरी मंडळाच्या पदाधिकारी व सदस्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष कोरकणकर यांनी केले आहे.

# ३२४ विकेट्स घेणाऱ्या भारताच्या खेळाडूची मोठी घोषणा

## स्टार खेळाडूने थेट टीम बदलली असल्याचे जाहीर

**नवी दिल्ली, दि. ११ :**

टीम इंडिया सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. इंग्लंड विरुद्ध इंडिया यांच्यात २० जून ते ४ ऑगस्ट दरम्यान ५ सामन्यांची मालिका खेळवण्यात येणार आहे. तसेच इंडिया ए विरुद्ध इंग्लंड लायन्स यांच्यातील २ अनऑफिशियल टेस्ट मॅचची सीरिज ०–० ने बरोबरीत राहिली. यानंतर आता भारतीय क्रिकेट वर्तुळातून मोठी बातमी समोर आली आहे. भारताच्या एका खेळाडूने थेट टीम बदलली आहे. भारताचा हा खेळाडू आता नव्या संघासोबत खेळताना दिसणार आहे. तो खेळाडू कोण आहे?

उत्तर प्रदेशचा स्टार स्पिनर सौरभ कुमार याने डोमेस्टिक सिजनआधी मोठी घोषणा केली आहे. सौरभ कुमार आतापर्यंत यूपी अर्थात उत्तर प्रदेश टीमकडून खेळत होता. मात्र आता येत्या हंगामापासून सौरभ आंध्रप्रदेशचं प्रतिनिधत्व करणार आहे. सौरभने गेल्या काही वर्षांत दमदार बॉलिंगच्या जोरावर देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपली छाप सोडली आहे. सौरभने देशांतर्गत क्रिकेटमध्ये ३०० पेक्षा अधिक फर्स्ट क्लास विकेट्स घेतल्या आहेत.

सौरभने सोशल मीडियावरुन आंध्रप्रदेशसाठी खेळणार असल्याचे जाहीर केले आहे. तसेच सौरभने या पोस्टद्वारे यूपीसीएचे आभार मानले आहेत. यूपीसीएसोबतच्या गेल्या १० वर्षांच्या



शानदार प्रवासासाठी मी आभार व्यक्त करतो. मला नेतृत्व करण्याची आणि शिकण्याची संधी दिल्याबद्दल मी यूपीसीएबाबत प्रामाणिकपणे कृतज्ञता व्यक्त करतो, असे सौरभने या पोस्टमध्ये म्हटले.

मी आंध्रप्रदेश क्रिकेट असोसिएशनसह क्रिकेटमधील नव्या प्रवासाला सुरुवात करत आहे. इथवरच्या प्रवासात माझ्यासोबत असणाऱ्या प्रत्येकाचा मी आभारी आहे. मी आंध्रप्रदेश क्रिकेट असोसिएशनसह जोडल्यांनतर उत्साहित आहे. या नव्या प्रवासाची सुरुवात करण्यासाठी मी प्रतिक्षेत आहे, असं म्हणत सौरभने आपण उत्सूक असल्याचं दाखवून दिले.

सौरभ कुमार याने ७९ फर्स्ट क्लास सामन्यांमध्ये २६.४५ च्या सरासरीने ३२४ विकेट्स घेतल्या आहेत. सौरभने या दरम्यान २५ वेळा ५ विकेट्स आणि ८ वेळा १० विकेट्स घेण्याचा कारनामा केला आहे. तसेच सौरभने बॅटिंगनेही धमाका केला आहे. सौरभने २ शतकं आणि १५ अर्धशतकं झळकावली आहेत. सौरभने फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये २ हजार ३%४ रन्स केल्या आहेत. तसेच सौरभने ३९ लिस्ट ए सामन्यांमध्ये ५१ तर ३३ टी २० सामन्यांमध्ये २४ विकेट्स घेतल्या आहेत. तसेच सौरभ कुमारची अनेकदा भारतीय संघात निवड करण्यात आली. मात्र सौरभला आंतरराष्ट्रीय पदार्पण करण्याची संधी मिळाली नाही.

## रोहित शर्माच्या वनडे क्रिकेटमधून निवृत्तीची चर्चा?

**मुंबई, दि. ११ :**

रोहित शर्माच्या वनडे क्रिकेटमधील निवृत्तीची जोरदार चर्चा सध्याच्या घडीला जोरदार सुरु झाली आहे. पण याबाबत बीसीसीआयमध्ये जोरदार चर्चा सुरू होती. पण रोहित वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेईल, असे बीसीसीआयला वाटत होते. पण रोहितने त्यानंतर पूर्ण गेमच फिरवल्याचे पाहायला मिळाले.

भारताने टी २– वर्ल्ड कप जिंकला आणि त्यानंतर रोहित शर्माने निवृत्ती जाहीर केली. त्यानंतर रोहित शर्मा फक्त कसोटी आणि वनडे क्रिकेट खेळू शकणार होता. पण त्यानंतर भारताला अजून एक घवघवीत यश मिळालं. भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफी खेळण्यासाठी दुबईत दाखल झाला. भारताने एकामागून एक सामने जिंकले आणि चॅम्पियन्स ट्रॉफीवर आपले नाव कोरले. त्यानंतर रोहित शर्माने जशी टी २० वर्ल्ड कपनंतर निवृत्ती घेतली, तशी आताही वनडे क्रिकेटमधून घेईल, असे बीसीसीआयला वाटत होते. पण त्यानंतर रोहित शर्माने पूर्ण गेमच फिरवला होता.

रोहित शर्माला काही गोष्टींचा अंदाज नक्कीच आला होता. आपल्या वनडे क्रिकेटमधील निवृत्तीची जोरदार चर्चा आहे, असे रोहितला समजले होते. चॅम्पियन्स ट्रॉफी भारताने जिंकल्यावर रोहित शर्मा मीडियासमोर आला. रोहित शर्माने



यावेळी सांगितले की, मी सर्वांना स्पष्टपणे सांगतो की, मी वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेत नाही. काही दिवसांपासून काही अफवा पसरत आहेत. त्यामुळे मला वाटते की, ही एक गोष्ट सर्वांसमोर स्पष्ट करायला हवी. त्यामुळे मी पुन्हा सांगतो की, मी वनडे क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेली नाही. रोहित शर्मा निवृत्ती घेईल, असे बीसीआयसला वाटत होते. शह–काटशह सुरु होते. पण त्याचवेळी रोहित शर्माने चांगलाच गेम केला आणि आपल्याबद्दलच्या वनडे क्रिकेटमधील रोहित शर्माने काही दिवसांपूर्वीच कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. पण आता त्याच्या वनडे क्रिकेटमधील निवृत्तीची जोरदार चर्चा सुरु झाली आहे. त्यामुळे रोहित शर्मा आता पुन्हा कोणतं पाऊल उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल.

## स्टीव्ह स्मिथने रचला इतिहास

### रिकी पॉंटिंगच्या खास क्लबमध्ये प्रवेश

**नवी दिल्ली, दि. ११ :**

बऱ्याच काळापासून वाट पाहत असलेला तो क्षण अखेर आला आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना, ज्याला टेस्ट वर्ल्ड कप म्हणूनही ओळखले जाते, तो आता सुरू झाला आहे. ज्यात ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेचे संघ आमनेसामने आहेत. दरम्यान, सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियन संघ प्रथम फलंदाजी करत आहे. दरम्यान, ऑस्ट्रेलियाच्या दिग्गज फलंदाजांपैकी एक असलेल्या स्टीव्ह स्मिथने त्याचा माजी कर्णधार रिकी पॉन्टिंगच्या विक्रमाची बरोबरी केली आहे.

आतापर्यंत सर्वाधिक आयसीसी फायनल खेळण्याचा विक्रम भारताच्या रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या नावावर आहे. जेव्हा आपण आयसीसी फायनलबद्दल बोलतो तेव्हा त्यात एकदिवसीय विश्वचषक, टी–२० विश्वचषक, चॅम्पियन्स ट्रॉफी आणि वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलचा समावेश आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी आतापर्यंत ९ आयसीसी




फायनल खेळले आहेत. त्यानंतर रवींद्र जडेजाचा क्रमांक लागतो, ज्याने आतापर्यंत आठ आयसीसी फायनल खेळले आहेत. भारताच्या युवराज सिंगने त्याच्या कारकिर्दीत सात आयसीसी फायनल खेळण्याचा मान मिळवला आहे.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार रिकी पॉन्टिंगने त्याच्या क्रिकेट कारकिर्दीत एकूण ६ आयसीसी फायनल खेळले होते, आता स्टीव्ह स्मिथनेही त्याच्या बरोबरीने धाव घेतली आहे. आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत ऑस्ट्रेलियन संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्ध उतरला तेव्हा हा त्याचा सहावा अंतिम सामना आहे. रिकी पॉन्टिंग आणि स्टीव्ह स्मिथ व्यतिरिक्त, श्रीलंकेचा कुमार संगकारा आणि महेला जयवर्धने यांनीही आतापर्यंत सहा आयसीसी फायनल खेळले आहेत. जरी सर्वाधिक आयसीसी फायनल खेळणारे खेळाडू भारतीय असले तरी, जर आपण ऑस्ट्रेलियाबद्दल बोललो तर आता रिकी पॉन्टिंगसोबत स्टीव्ह स्मिथचे नावही आले आहे.

स्टीव्ह स्मिथ अद्याप फलंदाजीला आला नसला तरी, ऑस्ट्रेलिया प्रथम फलंदाजी करत असल्याने त्याची फलंदाजी देखील लवकरच येईल. सध्या, डावाची सुरुवात उस्मान ख्वाजा आणि मार्नस लाबुशेन यांनी केली आहे. जरी ऑस्ट्रेलियन संघाला स्टीव्ह स्मिथ जितका जास्त वेळ फलंदाजी करायला येईल तितके चांगले वाटेल, परंतु स्टीव्ह स्मिथ त्याच्या सहाव्या आयसीसी फायनलमध्ये कशी फलंदाजी करतो हे पाहणे रंजक राहील.

# इंग्लंडमध्ये भारतीय संघाचा सराव

## कर्णधार शुभमन गिल व संघातील इतर खेळाडूंनी क्षेत्ररक्षणाचा सराव

**नवी दिल्ली, दि. ११ :**

बुधवारी भारतीय क्रिकेट संघाने इंग्लंडमध्ये क्षेत्ररक्षणाचा सराव केला. त्याचा व्हिडिओ बीसीसीआयने सोशल मीडियावर पोस्ट केला आहे. भारतीय संघाचा नवा कसोटी कर्णधार शुभमन गिल देखील इतर खेळाडूंसोबत झेल घेण्याचा सराव करताना दिसला. त्याच वेळी, भारतीय संघाचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराह देखील फेकणे आणि क्षेत्ररक्षण करताना दिसला.

रोहित शर्माच्या कसोटीतून निवृत्तीनंतर, २५ वर्षीय शुभमन गिलला भारतीय कसोटी संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. यष्टीरक्षक–फलंदाज ऋषभ पंतला उपकर्णधार बनवण्यात आले आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली कसोटी क्रिकेटमधून निवृत्त झाल्यानंतर संघाचा हा पहिलाच दौरा असेल.

भारतीय संघाने ८ जून रोजी पहिल्या सराव सत्रात भाग घेतला. प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी कठोर परिश्रम केले. तथापि, संघातील



अनेक खेळाडू इंडिया अ संघाचे सदस्य असल्याने सहभागी होऊ शकले नाहीत.

भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच कसोटी सामने खेळले जातील. पहिली कसोटी २० जूनपासून लीड्समध्ये सुरू होईल, तर शेवटची कसोटी ३१ जुलैपासून लंडनमधील ओव्हल येथे खेळली जाईल. २००७ पासून भारताने इंग्लंडमध्ये एकही कसोटी मालिका जिंकलेली नाही. अशा परिस्थितीत, संघ मालिका जिंकण्यावर लक्ष केंद्रित करेल.

**इंग्लंड दौऱ्यासाठी १८ सदस्यांचा भारतीय संघ**

शुभमन गिल (कर्णधार), यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू ईश्वरन, करुण नायर, ऋषभ पंत (उपकर्णधार), ध्रुव जुरेल, नितीश रेड्डी, शार्दुल ठाकूर, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप, अर्शदीप सिंह, कुलदीप यादव.

## ब्राझील २०२६ फिफा विश्वचषकासाठी पात्र



**नवी दिल्ली, दि. ११ :**

- पॅराग्वेचा १–० असा पराभव केला
- पॉइंट टेबलमध्ये तिसऱ्या स्थानावर पोहोचला

मंगळवारी ब्राझीलने पॅराग्वेचा १–० असा पराभव करून २०२६ च्या फिफा विश्वचषकासाठी पात्रता मिळवली, नवीन प्रशिक्षक कार्लो अँसेलोटी यांच्या नेतृत्वाखालील संघाचा हा पहिला विजय आहे.

रिअल माद्रिदचा स्टार खेळाडू व्हिनिसियस ज्युनियरने ४४ व्या मिनिटाला गोल करून ब्राझीलचे स्पर्धेत स्थान निश्चित केले. २०२६ चा फिफा विश्वचषक कॅनडा, अमेरिका आणि मेक्सिकोमध्ये होणार आहे. पाच वेळा विश्वविजेत्या ब्राझीलने मँचेस्टर युनायटेडकडून पदार्पण करणाऱ्या मॅथ्यूस कुन्हाच्या क्रॉसवरून विनिसियस ज्युनियरने गोल केल्याने १–० अशी आघाडी घेतली. त्याआधी, सामन्याच्या ३५ व्या मिनिटाला कुन्हाचा गोल हुकला. पॅराग्वेला पात्रता मिळविण्यासाठी एका गुणाची आवश्यकता होती, तर ब्राझीलला पुढे जाण्यासाठी विजयाची आवश्यकता होती.

या विजयासह, ब्राझील १६ सामन्यांतून २५ गुणांसह दक्षिण अमेरिकन संघाच्या गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे. टॉप–६ मध्ये स्थान मिळवून ते थेट विश्वचषकासाठी पात्र ठरतील. त्याच वेळी, पराभवानंतर, पॅराग्वेचे २४ गुण आहेत. २०१० नंतर पहिल्यांदाच विश्वचषकात स्थान मिळवण्यासाठी त्यांना आता फक्त एका गुणाची आवश्यकता आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २८० **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 280 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .